# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

९ वा मजला, सेंटर-१, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई ४०० ००५

दूरध्वनी: ०२२-२२१५२०१९ फॅक्स: ०२२-२२१५३७६५ ई-मेल: mwrralibrary@yahoo.co.in


---

**२०१० चा दावा क्र. ३**

**हेटवणे मध्यम पाटबंधारे प्रकल्प जि. रायगड च्या जल वितरणनियोजनातील फेरबदला विरोधातील याचिके संबंधात**

गणपूर्ती : श्री. ए. के. डी. जाधव सदस्य (अर्थव्यवस्था) व प्रभारी अध्यक्ष

श्री. व्ही. व्ही. गायकवाड सदस्य (अभियांत्रिकी)

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | प्रोफसर एन. डी. पाटील | महाराष्ट्र सिंचन संघ | |
| (२) | ॲडव्होकेट सुरेखा दळवी | सचिव श्रमिक क्रांती संघटना | |
| (३) | डॉ. सुबोध वागळे | विश्वस्त व गट समन्वयक | प्रयासचा संशोधन व उदरनिर्वाह साधन गट |
| (४) | श्री. सचिन वारघडे | वरिष्ठ संशोधन सहयोगी | |
| (५) | श्री. मंदार व्ही. साठे | वरिष्ठ संशोधन सहयोगी | |
| (६) | श्री. तेजस व्ही. पोळ | वरिष्ठ संशोधन सहयोगी | |

याचिकाकर्ते

विरुध्द

१) मुख्य अभियंता कोकण प्रदेश, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन

आणि

२) कार्यकारी संचालक (का. सं.) कोकण पाटबंधारे विकास महामंडळ (को. पा. वि. मं.) महाराष्ट्र शासन

-- उत्तरवादी

Note: -This is Marathi translation of the same order issued in English. In case of any inconstancy between the vernacular version and the English version, the English version will prevail.

टीप:- इंग्रजीत वितरीत केलेल्या आदेशाचेच हे मराठी भाषान्तर आहे. मराठी व इंग्रजी आवृत्तीत विसंगती आढळल्यास इंग्रजी भाषान्तर ग्राहय राहील.

# आदेश

प्राधिकरणाकडे याचिकाकर्त्यांनी संयुक्त याचिका दाखल केली असून त्यात त्यांनी म्हटले आहे की, जलसंपदा विभागाने हेटवणे मध्यम प्रकल्पासाठी मूळ जलवितरण नियोजनानुसार सिंचनासाठी असलेल्या पाण्यातून बिगर सिंचन वापरकर्त्यांकरिता बहुसंख्येने कायम व तात्पुरत्या आरक्षणाचे आदेश वितरित केले आहेत. त्याची परिणती समादेश क्षेत्रातील सिंचन क्षमता कमी होण्यात झाली आहे. याचिका कर्त्यांनी युक्तिवाद केला आहे की, असे बदल करण्याचा अधिकार जलसंपदा विभागास नसून, मजनिप्रा अधिनियम २००५ मधील कलम ११ अन्वये प्राधिकरणास आहे. याचिकाकर्त्यांनी विनंती केली आहे की, प्राधिकरणाने त्यांच्या अधिकारावरील हया अतिक्रमणाची दखल घ्यावी आणि बिगरसिंचन वापरकर्त्यांचे सर्व कायम व तात्पुरते आरक्षण रद्द करावे. याचिकाकर्त्यांनी अशी ही विनंती केली आहे की, जलसंपदा विभागास बिगर सिंचन वापरकर्त्यांकडून नुकसानभरपाई वा भागभांडवल स्वरुपात अशा पाण्याच्या आरक्षणासाठी गोळा केलेली रक्कम परत करण्याबाबत निदेश द्यावेत. तसेच जलसंपदा विभागाने या पुढे अशा आरक्षणाच्या नव्या प्रस्तावावर कार्यवाही करु नये. विनंत्या खालील प्रमाणे आहेत.

अ) हया विनंती अर्जातील इतर युक्तीवादास बाधा न येता, हेटवणे प्रकल्पाच्या वितरण प्रणालीत बदल करण्यासंबंधातील घेतलेल्या निर्णयांची स्वाधिकारे दखल घ्यावी, ज्यांत जलसंपदा विभागाने प्राधिकरणाच्या अधिकारावर दखल न देणे आणि / वा अतिक्रमण या बाबींचा समावेश होतो.

ब) जलसंपदा विभागास हेटवणे प्रकल्पातून बिगरसिंचन वापरकर्त्यांसाठी हयापूर्वी दिलेली तसेच मजनिप्रा अधिनियम पारित झाल्यानंतर, जी मूळ जलवितरण नियोजनाशी वा आराखडयांशी सुसंगत नाहीत, अशा दिलेली सर्व स्थायी व तात्पुरती जल आरक्षणे रद्द करणेबाबत निदेश द्यावेत.

क) बिगरसिंचन वापरकर्त्यांकडून जल आरक्षणाच्या बदल्यात जमा केलेली नुकसान भरपाई वा भागभांडवलाची रक्कम परत करणेबाबत निदेश जलसंपदा विभागास द्यावेत.

ड) जलसंपदा विभाग व को. पा. वि. मं आणि इतर संबंधीत यंत्रणांनी यापुढे हेटवणे प्रकल्पातून बिगर सिंचन वापरासाठी दाखल झालेल्या व भविष्यकालीन प्रस्तांवांवर कोणतीही कार्यवाही न करण्याबाबत निदेश द्यावेत.

## २. घटनानुक्रम

याचिका दाखल केल्यानंतरचा घटनाक्रम खालीलप्रमाणे होता:

| | |
|---|---|
| ७.५.२०१० व १२.५.२०१० | प्राधिकरणाने उत्तरवादींना दि. ७.५.२०१० अन्वये व लगेचच प्रधान सचिव (जसंप्र व वि) हयांना दि. १२.५.२०१० अन्वये याचिकेस उत्तरे देण्याबाबत निदेशीत केले आहे. |
| १.६.२०११ | उत्तरवादींना त्यांचे दिनांक १.८.२०१० चे पत्रान्वये प्राधिकरणाच्या दृष्टोपत्तीस आणून दिले की, अप्पर वर्धा प्रकल्पातून औष्णिक वीज प्रकल्पास पाणी देण्यासंबंधातील, अशाच स्वरुपाचे प्रकरण (क्र. १०३८/२०१०) मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाकडे प्रलंबीत असून, त्या निर्णयाचा परिणाम सद्यस्थितीतील याचिकेवर होण्याची शक्यता असल्याने, सदर प्रकरणी उच्च न्यायालयाकडून निर्णय होईपावेतो, प्राधिकरणाने याचिकाकर्त्यांच्या प्रकरणाची सुनावणी लांबणीवर टाकावी |
| २२.४.२०११ | प्रक्षेत्रीय वाटप व हक्कदारी बाबत राज्य शासनाची व प्राधिकरणाची भूमिका स्पष्ट करण्यासाठी शासनाने म. ज. नि. प्रा. (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अधिनियम २०११ अधिनियमीत केला व तो प्रतींसह प्राधिकरणास व उच्च न्यायालयात सादर केला. |
| २९.४.२०११ | प्राधिकरणाने उत्तरवादींना दि. २९.५.२०११ पावेतो याचिकाकर्त्यांना मुद्देनिहाय उत्तर देण्याबाबत निदेशीत केले. |
| ६.६.२०११ | दि. ३०.६.२०११ ला प्राधिकरणाने याचिकाकर्त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी सर्वांना उपस्थित राहण्याबाबत सूचना व उत्तरवादींना मुद्देनिहाय उत्तर दाखल करण्यासाठी २०.६.२०११ पावेतो अवधी मान्य केला. |
| १७.६.२०११ | उत्तरवादींनी दि. १४.८.२०११ अन्वये कार्यकारी अभियंता को. पा. वि. मं हयांचे मार्फत त्यांची उत्तरे दाखल केली त्याचीच प्रत याचिकाकर्त्यांना वितरीत केली. |
| ३०.६.२०११ | याचिकेची सुनावणी दि. ३०.६.२०११ ला झाली.<br>१) सुनावणीच्या दिवशी उत्तरवादींनी दि. १४.६.२०११ रोजी दाखल केलेल्या उत्तरावर अधिक्रमीत सुधारीत म्हणणे व दि. २९.६.११ अन्वये शपथपत्र दाखल केले व सुनावणीच्या वेळी याचिकाकर्त्यांना त्याची प्रत दिली.<br>२) याचिकाकर्त्यांनीही लेखी निवेदन (क्र. १, २, ३) सादर केले व ते नोंदवण्यात आले. ही निवेदने म्हणजे दि. १४.६.२०११ अन्वये उत्तरवादींना |

दिलेल्या उत्तरावरील प्रतिसाद होता.  निवेदनाच्या प्रती उत्तरवादींना देण्यात आल्या.

३) दोन्ही बाजू ऐकून घेतल्यावर, प्राधिकरणाने उत्तरवादींना बिगरसिंचन वापर कर्त्यांना विविध परवान्यांची व प्रकल्पाच्या भूसंपादनाच्या सद्यस्थिती बाबत अतिरीक्त माहिती दि. २८.७.२०११ पूर्वी पाठवणेबाबात निदेशीत केले.

४.७.२०११ प्राधिकरणाने कार्यवृत्तांच्या नोंदी वितरीत केल्या, उत्तरवादींना दिलेल्या सुधारीत उत्तरावरील प्रतिसादासाठी याचिकाकर्त्यांना दि. २८.७.२०११ पावेतो चार आठवडयाचा कालावधी देण्यात आला.  तसाच कालावधी पाण्याची उपलब्धी, भूसंपादनाची सद्यस्थिती याबाबातची माहिती सादर करण्यासाठी उत्तरवादींना देण्यात आला.

२७.७.२०११ दि. २९.६.२०११ च्या संदर्भात याचिकाकर्त्यांनी सुधारीत उत्तर सादर केले व त्याची प्रत उत्तरवादींना दिली.

३.८.२०११ उत्तरवादींना दि. ३०/६/२०११ च्या कार्यवृत्ताच्या नोंदणीनुसार प्राधिकरणाने सुनावणीच्या वेळी विचारणा केलेली अतिरीक्त माहिती व ३०.८.२०११ च्या सुनावणीच्या वेळी याचिकाकर्त्यांनी दाखल केलेल्या निवेदन क्र. १ वरील अभिप्राय सादर केला.

८.८.२०११ उत्तरवादींना प्राधिकरणाच्या निदेशानुसार याचिकाकर्त्यांना अभिप्राय व अतिरीक्त माहितीची प्रत दिली.

१४.९.२०११ प्राधिकरणाने दि. १४.९.२०११ ला पुन्हा सुनावणी घेतली.  याचिकाकर्त्यांनी उत्तरवादींच्या अभिप्रायावर व माहितीवर लेखी निवेदन दाखल केले.

## ३. हेटवणे प्रकल्प

१. सादर झालेली विविध निवेदने व जलसंपदा विभागाने प्राधिकरणास पुरवलेल्या माहितीवरुन असे दिसून येते की, हेटवणे मध्यम प्रकल्पास ६७५३ हेक्टर सिंचनासाठी जलसंपदा विभागाने दि. ८/१/१९८१ रोजी मूळ प्रशासकीय मान्यता दिली.  त्यानंतर प्रकल्प अहवाल २ वेळा सुधारीत करण्यात आल्यावर प्रकल्पाच्या ६०५६ हेक्टर सिंचनासाठी दि. १७.६.२००८ रोजी तृतीय प्रशासकीय मान्यता दिली. सिंचन कमी होण्याचे मूळ कारण म्हणजे क्षारपड जमीन असणारे ८१२ हेक्टर क्षेत्र वगळण्यात आले.  प्रकल्पाचा उपयुक्त साठा १४४.९८ दलघमी आहे.

२. पूर्वीच्या नियोजनानुसार बिगर सिंचन वापरासाठी, ज्यात २.३३ दलघमी पेण शहरासाठी पाणी पुरवठा व उर्वरीत ३६.५० दलघमी सिडकोसाठी असा मिळून ३८.८३ दलघमी साठा निर्धारित केला. ७.४ दलघमी बाष्पीभवन व्यय वगळता उर्वरीत १०६ दलघमी सिंचनासाठी होता. तथापि त्यानंतर वेळोवेळी बिगर सिंचनासाठी म्हणजे घरगुती व औद्योगिक वापरकर्त्यांसाठी (ज्यात महामुंबई विशेष आर्थिक क्षेत्रासही वाटपाचा समोवश होता) करावे लागले. हे वाटप ७०.३ दलघमी येत असून सिंचनासाठी असलेल्या पूर्व नियोजनानुसार ९८.८० दलघमी पासून २८.५० दलघमी पर्यंत पाण्याची मोठी कपात करावी लागली. हाच याचिकाकर्त्यांचा दाव्याचा गाभा आहे, ज्यामुळे बिगर सिंचन वापरकर्त्यांचे वाढीव वाटप रद्दबातल होऊन सिंचनाचे मूळ वाटप पूर्ववत होणे अपेक्षित आहे.

## ४. याचिकाकर्त्यांची बाजू

प्राधिकरणापुढे याचिकाकर्त्यांच्या याचिकेद्वारे खालील युक्तीवाद मांडण्यात आले आहेत.

१. २००५ च्या प्राधिकरण अधिनियमातील कलम ११ (क) नुसार प्राधिकरण पाण्याची हक्कदारी ठरवणे व तिचे वाटप करणेस सक्षम आहे. मजनिप्राच्या अधिनियमाच्या प्रास्तविकातही प्राधिकरण महाराष्ट्र राज्यातील जलसंपत्तीचे, विविध प्रवर्गातील वापरासाठी न्यायोचित व समन्यायी वाटप सुकर होण्याकरिता सुनिश्चिती करेल. म्हणून मजनिप्रा २००५ च्या अधिनियमाच्या दिनांकापासून सर्व प्रकल्पांच्या पाणी वाटपासंबंधातील सर्व निर्णय मजनिप्रा २००५ अधिनियमातील तरतुदीनुसार घेण्यास सक्षम आहे. हयात ज्या ज्या ठिकाणी उच्चस्तरीय समितीने प्रकल्पाच्या पाण्याच्या हक्कदारी संबंधात, वाटपात, आणि निर्धारित करण्यास प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे घेतलेल्या निर्णयाचा समावेश असेल.

२. पाणी वाटपात एकदा बदल केला तर त्याची परिणती नव्या पाणी वापराच्या अधिकारात होते. असे बदल पुन्हा मूळ पदावर आणणे अवघड असते. कारण अधिकार प्राप्त करण्यासाठी नवीन वापरकर्त्यांना नवीन पायाभूत सुविधातील गुंतवणूक करावी लागलेली असते. सबब असे बदल मजनिप्रा २००५ च्या अधिनियमाद्वारे समन्यायी वाटपाच्या आश्वासित अधिकारावर तीव्र परिणामक्षम ठरतात.

३. मजनिप्रा अधिनियमातील कलम १२ (६) (क) व (ख) अन्वये प्रत्येक जमीनदार हा त्याच्या देय पाण्याच्या हक्कासाठी हक्कदार असल्याने उच्चाधिकार समितीने बिगर

सिंचन वापर कर्त्यांसाठी हेटवणे प्रकल्पातून सिंचनाच्या पाण्यात कपात करणे न्याय्य ठरणारे नाही.

४. नीरा-देवघर सिंचन प्रकल्पाच्या खाजगीकरणाच्या संबंधात प्राधिकरणाच्या आदेशान्वये (दि. १०/११/२००८ ची बाब / सन २००८ चा दावा क्र. १) प्राधिकरणाने स्पष्ट केले आहे की, शेतक-यांना त्यांचे सर्व लाभ, जे प्रकल्पाच्या मूळ 'लाभ व व्यय पृथक्करणात' आश्वासीत केले आहेत ते मिळावयास हवेत. याचिकाकर्त्यांनी हे ठासून प्रतिपादीत केले आहे की, हेटवणे प्रकल्पाच्या मूळ नियोजनात ६६६८ हेक्टर सिंचन लाभ होणे अपेक्षित आहे. परन्तु उच्चाधिकार समितीच्या मूळ पाणी वाटपात बदल करण्याच्या निर्णयामुळे हेटवणे प्रकल्पाची सिंचन क्षमता कमी झाली. हे नीरा-देवघर प्रकल्पाच्या प्रकरणी प्राधिकरणाने दिलेल्या निदेशाच्या विसंगत आहे.

५. बिगर सिंचन वापरकर्त्यांना अतिरिक्त पाणी आरक्षीत करावयाच्या उच्चाधिकार समितीच्या निर्णयाच्या आधारावर सिंचनाच्या पाण्याच्या कपातीसाठी काही रक्कम नवीन वापरकर्त्यांनी शासनास नुकसान भरपाई म्हणून अदा करावी हया उत्तरवादींच्या प्रस्तावास कोणताही कायदेशीर आधार नाही. तसेच ही नुकसान भरपाई ठरवितांना प्रकल्पाच्या मूळ लाभधारकांच्या नुकसानीचा विचार केलेला नाही. व शेतकऱ्यांबरोबर याबाबत कोणतीही सल्लामसलत करण्यात आलेली नाही.

६. उच्चाधिकार समितीच्या सूचनेनुसार, जलसंपदा विभागाने नवीन बिगर सिंचन वापर कर्त्यांकडून पाणी आरक्षणाच्या मोबदल्यात 'भाग भांडवल' घेण्याची शिफारस केली. हयामुळे प्रकल्पाच्या 'महसूलाची चौकट' बदलेल व पाणी वापरावर हक्क निर्माण होतील. यासाठी “भाग भांडवल” घेण्याच्या प्रस्तावाचा आढावा व मंजूरी प्राधिकरण अधिनियम २००५ मधील कलम ११ (क) व ११ (च) नुसार घेणे गरजेचे आहे.

७. जलवितरणातील बदल हा जमिनीचा वापर व पिकरचनेशी निगडीत असल्याने त्याचा जनतेच्या जीवन व उदर निर्वाहावर परिणाम होणार आहे. हे निर्णय ज्या आधार सामुग्रीवरुन घेण्यात आले त्याचे सक्षम व स्वतंत्र प्राधिकरणाकडून पृथक्करण व्हावे. मजनिप्रा हे असे प्राधिकरण असून जलसंपदा विभागाने पुनर्विलोकन, विधिग्राहयता व मंजुरीसाठी मजनिप्राकडे आधारसामुग्री पाठवावयास हवी.

८. मजनिप्रा अधिनियम २००५ हा अधिनियमित होऊन ५ वर्षे होत आली तरी राज्य शासनाने कलम ११ (क) नुसार नियम अंतिम केलेले नाहीत. जरी नियम करणे ही शासनाच्या कक्षेतील बाब असली तरी अशा नियमाअभावी हक्कदारीशी संबंधीत वैध अशा तरतुदी व पाणी वाटपाचे उल्लंघन होत असेल तर नियमाअभावी प्राधिकरण अशा प्रकरणी कार्यवाही करण्यास सक्षम आहे. काही पथदर्शक प्रकल्पाबाबत असे करण्यात आले आहे.

९. याचिकाकर्त्यांनी मूळ वितरण आराखडयातील वाटपाच्या बदलास आवाहन केले असून हक्कदारी ठरवणे व त्याचे वाटप हया साठी मजनिप्रास अधिकार प्रदान केले आहेत. जलसंपदा विभाग / उच्चधिकार समितीस हे अधिकार नाहीत अशी भूमिका घेतली आहे.

**५. उत्तरवादींची उत्तरे**

५.१ उत्तरवादींनी पहिला जबाब दि. १४.६.२०११ ला दाखल केला. युक्तीवाद सारांशाने खालीलप्रमाणे :-

१) मजनिप्रा अधिनियमापूर्वी उच्चाधिकार समितीच्या मंजुरीच्या प्रक्रिया सुरु केल्या गेल्या.

२) मजनिप्रा अधिनियमातील कलम ११ (छ) (२) अन्वये नदी खोरे अभिकरण प्रकल्प स्तरावरील हक्कदारी ठरवू शकते. त्यामुळे मजनिप्रा अधिनियमातील तरतुदींचा भंग झाला नाही. कलम ११ (च) हे नवीन प्रकल्पांसाठी आहे.

३) कालव्यांच्या भूसंपादनाची प्रक्रिया १९८८-८९ ला सुरु झाली. परंतु शेतकऱ्यांकडून सतत विरोध असल्याने प्रक्रिया थांबली.

४) विद्यमान सिंचन क्षमता १३०१ हे. एवढी आहे. परंतु लाभार्थींकडून केवळ १२५ हे. एवढाच वापर होतो.

५) सिंचन क्षमतेतील कपातीसाठी द्यावयाच्या नुकसान भरपाईची रक्कम व भाग भांडवल तत्संबंधीत शासन आदेशानुसार ठरवली आहे.

६) हक्कदारीबाबतची नियमावली केली नसली तरी महाराष्ट्र शासनाने ह्यासाठी प्राधान्य निश्चित केले आहे.

७) राज्य जलनीती व कोकण पाटबंधारे विकास मंडळ अधिनियमाची दखल घेतली आहे.

५.२ उत्तरवादींनी त्यांच्या आधीचे दि. १४.६.११ चे पत्र अधिक्रमीत करुन दि. २९.६.११ नुसारच्या त्यांच्या म्हणण्यात व शपथपत्रात सादर केले आहे की, सुधारित अधिनियम २०११ च्या विविध तरतुदी पहाता याचिका अप्रस्तुत ठरते. युक्तीवाद सारांशाने खालीलप्रमाणे:-

१)	सुधारित अधिनियम २०११ च्या कलम ३१ (क) अन्वये "पाण्याची हक्कदारी" ही संज्ञा महाराष्ट्र सिंचन पध्दतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियम २००५ [ ( म.सि. प. शे.व्य.) अधिनियम २००५ ] अन्वये कार्यक्षेत्र निश्चित करण्यासह ज्या क्षेत्रांमध्ये सर्व संबंध्द तरतुदींचे अनुपालन केले असेल अशा क्षेत्रांनाच लागू होईल. मजनिप्रा अधिनियमातील  तरतुदी सर्व प्रकल्पांना लागू नाहीत आणि हेटवणे प्रकल्प हा प्राधिकरणाच्या सुधारित अधिनियमाखाली येत नाही.

२)	मजनिप्रा ( सुधारणा व पुढे चालू ठेवणे ) अधिनियम २०११ मधील कलम ३१ (ख) नुसार ( व कलम १ च्या ) प्रारंभाच्या दिनांकापूर्वी म्हणजेच दिनांक १७ सप्टेंबर २०१० पूर्वी उच्चाधिकार समितीने दिलेल्या सर्व परवानग्या ह्या वैध असतील.

३)	मजनिप्रा (सुधारणा व पुढे चालू ठेवणे ) अधिनियम २०११ मधील कलम ३१ (ग) नुसार दि. १७.९.२०१० पूर्वी उच्चाधिकार समितीने केलेल्या वाटपास कोणत्याही न्यायालयासमोर, न्यायाधिकरणासमोर किंवा इतर प्राधिकरणासमोर, पाणी घेण्यासाठी अशी परवानगी, वाटप, मंजुरी, प्राधिकार किंवा पाण्याची हक्कदारी यांना आक्षेप घेणारा कोणताही दावा , खटला किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही आणि या अधिनियमान्वये आवश्यक असलेली कोणतीही परवानगी, वाटप, मंजुरी, प्राधिकार किंवा पाण्याची हक्कदारी मिळविण्यात आलेली नाही या कारणावरुन, असा कोणताही दावा, खटला किंवा इतर कार्यवाही दाखल करता येणार नाही किंवा चालू ठेवता येणार नाही. सबब याचिका अप्रस्तुत ठरते.

४)	सद्यस्थितीत १३०१ हे. सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. परंतु शेतकऱ्यांकडून पाण्याची मागणी कमी आहे आणि समादेश क्षेत्रातील सिंचन कधीही १२५ हे. पेक्षा जास्त झाले नाही म्हणून बिगर सिंचन प्रयोजनासाठी वळवण्यात आलेल्या पाण्यामुळे सिंचनावर परिणाम झाला हे म्हणणे खरे नाही. आतापावेतो निर्माण करण्यात आलेल्या मर्यादित साधनसामुग्रीचा लाभधारकांनी वापर केला नाही. सबब तात्पुरत्या तत्वावरील बिगर सिंचन वापर समर्थनीय आहे.

५)	याचिकेतील इतर मुद्दे

सुधारणा अधिनियम २०११ पहाता याचिकेत उल्लेख केलेल्या इतर मुद्यांना गुणात्मक मूल्य नाही. नाहीतरी उच्चाधिकार समितीच्या निर्णयानंतर ३ वर्षांनी याचिका दाखल करण्यात आली आणि म्हणून 'सामान्य मर्यादा उल्लंघन कायदा' लागू पडला असता.

**६. दिनांक ३०.६.२०११ च्या याचिकाकर्त्यांच्या सादरीकरण क्र.१,२ व ३ मधील उपस्थित केलेले मुद्दे -**

उत्तरवादींच्या दि. १४.६.२०११ च्या उत्तराने दि. ३०.६.२०११ चे जे सादरीकरण सुधारित उत्तराने अधिक्रमित झाले व सादरीकरणातील जे मुद्दे सुधारित उत्तराशी संबध्द आहेत ते सारांशाने खालीलप्रमाणे:-

**<u>सादरीकरण क्र.१</u>**

१) महा मुंबई (विशेष आर्थिक क्षेत्र) विशेष आर्थिक क्षेत्राच्या उभारणीसाठीच्या प्रस्तावाचे स्थगिती व मागे घेण्याच्या पार्श्वभूमीवर समादेश क्षेत्रातील २४०१ हे. क्षेत्र औद्योगिक वापरासाठी म.मुं. वि. आ. क्षेत्राचे संपादन केले होते. आता जमीन सिंचन वापर प्रवर्गात आली आहे.

२) डिसेंबर २००७ मध्ये काही बिगर सिंचन वापर संस्थांनी केलेले पाणी आरक्षण त्यांनी विहित केलेल्या ३ वर्षाच्या कालावधीत पाणी उचल करण्याची व्यवस्था न केल्याने आपोआप व्यपगत झाले आहेत.

३) कोकण पाटबंधारे विकास महामंडळ ज्या ६१२ हे. क्षारपड जमिनीला सिंचित करता येत नाही असा दावा करते ती पुन:प्रापीत करता येईल.

**<u>सादरीकरण क्र.२</u>**

१) शेतकरी सिंचनासाठी पाणी घेण्यास उत्सुक आहेत आणि ह्यासाठी त्यांनी लेखी अर्ज केले आहेत परंतु त्यांना शासकीय प्रतिसाद नाही.

२) सिंचनासाठी पाणी वापर कमी होतो याचे कारण शेतकऱ्यांकडून मागणीचा अभाव हे नाही. वितरणव्यवस्थेतील तांत्रिक उणीवा, कमी विश्वसनीयता व पिकाच्या गरजेला अनुरुप नसणारे पाणी पाळयांचे विसंगत वेळापत्रक यांसारखी अनेक कारणे होत. वितरणव्यवस्था पूर्ण करणे गरजेचे आहे. सबब कमी वापराची कारणमींमासा करणे गरजेचे आहे.

३) सिडकोसाठी केलेल्या आरक्षणाचे उदाहरण पहाता तात्पुरत्या वाटपाचे रुपांतर कायमस्वरुपात करण्याची वृत्ती दिसते. अशा रुपांतरास प्रतिबंध करण्याचा मार्ग म्हणजे सिंचन क्षेत्रासाठी कायम स्वरुपी आरक्षण करणे.

**<u>सादरीकरण क्र.३</u>**

मजनिप्राने याचिकेच्या प्रक्रियेस गैरवाजवी उशीर लावल्याने प्राथमिक आधारावरील न्याय मिळण्याच्या संधीस मुकावे लागले. याचिकेस १ वर्षापेक्षा उशीर झाला आणि सुधारणा अधिनियमही त्याच कालावधीत मंजूर झाल्याने याचिकाकर्त्यांच्या युक्तीवादावर परिणाम झाला. मजनिप्राने प्रक्रियेस झालेल्या विलंबाबाबत कोणतीही कारणे दिली नाहीत.

**७. उत्तरवादींच्या २९.६.२०११ च्या सुधारित उत्तरावर याचिकाकर्त्यांच्या दिनांक २७.७.२०११ चा प्रतिसाद -**

१) हक्कदारीशी संबंधित तरतूदी व निकष हे स्थायी आहेत. त्यांना बांधील राहणे त्या तरतुदी लागू होण्याच्या कालमर्यादेने परिमित असू नयेत. सर्व प्रकल्पांच्या समादेशातील सिंचित जमिनीचे म.सिं.प.शे. व्य. अधिनियमाद्वारे 'कार्यक्षेत्र निश्चित' होईल व भविष्यात पाणी वापर संस्थांच्या निर्मितीनंतर पाणी हक्कांचे संरक्षण करणे गरजेचे ठरेल. त्यांच्या जमिनीची कार्यक्षेत्र निश्चिती होवो वा न होवो, लाभक्षेत्रातील सर्व शेतकऱ्यांना पाणी मिळेल अशा पध्दतीने कार्यवाही करण्यास प्राधिकरण कलम १२ (६) नुसार बांधील आहे.

२) मुख्य अधिनियमातील सुधारणेपूर्वी याचिका दाखल करण्यात आली. जलसंपदा विभागाची कार्यवाही (बिगर सिंचन परवानग्या देवून सिंचन क्षमता कमी करणे) आता सुधारणा अधिनियमामुळे समर्थनीय झाली.

३) उच्चाधिकार समितीने मान्य केलेल्या परवानग्या / वाटप / मंजुरी / हक्कदारीचे प्राधिकार इत्यादी बाबींमध्ये सदर प्राधिकार मंजूर करतांना त्यात महत्वाचा बदल असतानाही असे वाटप ग्राह्य राहील असा सुधारणा अधिनियमात कोठेही उल्लेख नाही.

४) याचिका दाखल करण्यास झालेल्या विलंबाबाबतच्या मुद्याबाबत व सामान्य मर्यादा उल्लंधन कायदा पहाता याचिकाकर्त्यांनी निवेदन केले आहे की, उच्चाधिकार समितीचे निर्णय जनतेकडे नेण्यात आले नाहीत वा जनतेच्या माहितीसाठी कोठेही प्रसिध्द केले नाहीत. परिणामी बिगर सिंचन वापरकर्त्यांना पाण्याचे आरक्षण झ ााल्याचे याचिकाकर्त्यांना ज्ञात झाले नाही. उपरोक्त निर्णयाची माहिती उत्तरवादींच्या दि. १५.४.२०१० च्या पत्राद्वारे माहितीच्या अधिकारान्वये प्राप्त करण्यात आली. त्यानंतर प्राधिकरणापुढे २० एप्रिल २०१० ला याचिका दाखल करण्यात आली.

## ८. उत्तरवादींनी सादर केलेल्या पाणी वाटप व भूसंपादनाच्या सद्यस्थितीबद्दल माहिती

१) उत्तरवादींच्या दि. ३/८/११ च्या पत्रात दिलेली विविध बिगरसिंचन वाटपाची सद्यस्थिती खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | संस्थेचे नांव | मंजूर पाणी-वापर (दलघमी) | क्षेत्रा-तील कपात (हे) | क्षेत्र कपातीसाठी मिळालेली नुकसान भरपाई (रु. लक्ष) | प्राप्त झालेले भाग भांडवल (रु. लक्ष) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | **पिण्याच्या पाण्यासाठी कायमस्वरुपी आरक्षण** | | | | | |
| १) | सिडको नवी मुंबई | ३६.५० (नाशविरहित) | -- | -- | ४७०० | पाणी उचल प्रगतिपथावर |
| २) | सिडको नवी मुंबई | १८.२५ (नाशविरहित) | १२४१ | -- | ९०० | पाणी उचल सुरु झाली नाही |
| ३) | वाशी पाणी पुरवठा योजना | ०.२७ (नाशविरहित) | २६ | १३.०० | -- | वरीलप्रमाणे |
| | **औद्योगिक वापरासाठी कायमस्वरुपी आरक्षण** | | | | | |
| ४) | इस्पात जलविद्युत प्रकल्प, ता. पेण | २३.४० | १४८९ | -- | -- | दि. १९/७/२०११ च्या पत्रान्वये वाटप रद्द |
| ५) | टाटा पॉवर कंपनी ता. पेण | ५.३४ | ३४० | -- | -- | दि. २१/७/२०११ च्या पत्रान्वये वाटप रद्द |
| | **औद्योगिक वापरासाठी तात्पुरते आरक्षण** | | | | | |
| ६) | सिडको नवी मुंबई | १३.५५५ | -- | -- | -- | दि. १/८/२०११ च्या पत्रान्वये वाटप रद्द |
| ७) | महामुंबई वि.आ.क्षे., ता. पेण | ९.५१० | -- | -- | -- | दि. १९/७/२०११ च्या पत्रान्वये वाटप रद्द |

पूर्वीच्या आराखडयानुसार बिगरसिंचनासाठी ३८.८३ दलघमी वाटप होते. सुधारीत आराखडयानुसार सिडको व वाशी पाणी पुरवठयासाठी १८.५० दलघमी वाटप दिल्याने एकूण ५३.३३ दलघमी येते. सबब पूर्वीच्या आराखडयानुसार ९८.८० दलघमी पाणी वाटपातून ६०५६ हे सिंचना ऐवजी सिंचनाच्या वाटपात ८० दलघमी कमी होत असून त्यातून ५४५० हेक्टर सिंचन होऊ शकते.

(२)	भूसंपादनासाठी उत्तरवादींनी खालील माहिती पुरवली आहे.

| **संवर्गहनिहाय लागणारी जमीन** | **हेक्टर** |
|---|---|
| खाजगी | २४५.६३ |
| वन | ३३.०५ |
| एकूण | २७८.६८ |

| **आतापावेतो संपादित केलेली जमीन** | **हेक्टर** |
|---|---|
| खाजगी | १६८.९६ (अदायगी झालेले) |
| वन | २७.८१ |
| एकूण | १९६.७९ |

२/३ वर्षात भूसंपादन पूर्ण होऊ शकणारी जमीन		५६.६५ हेक्टर

लहान जमीन धारक, नुकसान भरपाई दर		२०.०२ हेक्टर
त्यामुळे भूसंपादनासाठी समस्या येत असलेली जमीन

एकूण २७८.६८ हेक्टर जमीनी पैकी १९६.७९ हे जमीन संपादण्यात आली. ५६.६५ हे संपादनाखाली असून २०.७२ हे क्षेत्र वादग्रस्त आहे.

(३)	उत्तरवादींनी पुढे प्रतिपादन केले आहे की, शासनाचा तात्पुरते आरक्षण कायमस्वरुपात रुपान्तरीत करण्याबाबत कोणताही प्रस्ताव विचाराधीन नाही आणि मजनिप्राकडून पुनर्विलोकनाची गरज नाही. (तसेच) ३ वर्षात सोडण्यात आलेल्या पाण्याच्या माहितीवरुन शेतकऱ्यांना पाणी दिले नाही हे अमान्य करण्यात आले.

**९.	(१) ३०.६.२०११ च्या कामकाजाच्या नोंदी (२) याचिकाकर्त्यांचा प्रस्ताव १, २, ३ वरील प्रतिसाद, हयावर उत्तरवादींचे दि. ३/८/२०११ नुसार अभिप्राय**

१.	आदेशातील परिच्छेद ६ नुसार याचिकाकर्त्यांच्या ३ सादरीकरणांवर उत्तरवादींना कामकाजाच्या नोंदणीनुसार उत्तर देण्यास सांगण्यात आले. सादरीकरण १ वरील अभिप्राय स्वतंत्ररित्या दिले आहेत. उत्तरवादींनी १४.६.२०११ नुसार सादरीकरण २ वरील अभिप्राय दिलेला असल्याने व तो दि. २९/६/२०११ नुसार सुधारण्यात आल्याने अधिक्रमित झाला. सादरीकरण ३ हे जलसंपदा विभागाशी संबंधित नसून प्राधिकरणाशी संबंधीत असल्याने अभिप्राय दिले नाहीत.

२. कामाच्या व भूसंपादनाच्या सद्यस्थितीबाबत प्राधिकरणाने मागवलेली माहिती ही बाब औचित्याला धरुन नाही. कारण प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा ही शासनाच्या अखत्यारितील बाब आहे. प्राधिकरणाच्या नाही.

३. तीन वर्षाच्या मुदतीत पाणी उचल करण्याची व्यवस्था करण्यात न आल्याने ५१.८०५ दलघमी पाणी वाटप रद्द करावे लागले व सिंचन प्रयोजनात पुनर्स्थापित केल्याने सिंचन वाटप मूळ ९८.८० दलघमी ऐवजी ८० दलघमी झाले. हे ५४५० हे सिंचनास पुरेसे आहे. म्हणजे मूळ ६६७० हे. क्षेत्र पहाता १२२० हे. कमी होते. हे केवळ पिण्याच्या पाण्याच्या गरजांमुळे.

४. उच्चधिकार समितीने मान्य केलेली सर्व बिगरसिंचन आरक्षणे रद्द केल्याने मजनिप्राच्या हस्तक्षेपाची गरज नाही.

## १०. दि. ३०/८/२०११ च्या उत्तरवादींच्या उत्तरावर दि. १४/९/२०११ अन्वये याचिकाकर्त्यांचे सादरीकरण

१. दि. १४/६/२०११ चे अभिप्राय अधिक्रमित झाल्याने सादरीकरण क्र. २ वर उत्तरवादींनी अभिप्राय दिला नाही. सबब अर्जदारांचा सादरीकरण २ मधील केलेला युक्तिवाद व विनंती उत्तरवादींनी स्विकारली असे समजण्यात येत आहे.

२. (१) प्रकल्पाच्या बांधकामाचा व (२) कोकणातील भौतिक अनुशेष निवारण्याबाबतचा आढावा घेण्यास अधिनियमातील विविध तरतुदी पहाता मजनिप्रा पूर्णपणे सक्षम आहे.

३. म. मु. वि. आ. क्षे. (महामुंबई विशेष आर्थिक क्षेत्र) चे स्थगितीकरण पहाता जे क्षेत्र म. मु. वि. आ. क्षे. साठी निर्धारित केले होते त्या २४०१ हे. क्षेत्रातील वितरिकेचे काम त्वरीत सुरु करावे.

४. कोणत्याही स्थितीत बिगर सिंचन वापराचे आरक्षण पुनर्स्थापित करण्यात येऊ नये अशा सूचना मजनिप्राने पारित कराव्यात.

५. म. सिं. प. शे. व्य. अधिनियम २००५ (महाराष्ट्र सिंचन पध्दती शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियम २००५) मधील तरतुदीची पूर्तता होईपावेतो बिगर सिंचन वापरकर्त्यांना हक्कदारी देण्यात येऊ नये. शेतकऱ्यांच्या हक्कांच्या सुरक्षिततेसाठी हे आवश्यक आहे.

६. पाण्यासाठी अपेक्षा असणारे शेतकरी व प्रकल्पास विरोध करणा-यांशी अर्थपूर्ण संवाद केल्यास भूसंपादनाशी संबंधीत असलेल्या बाबींची उकल होईल.

७. सिडकोस पाणी तूट कमी करणे शक्य आहे. पिण्यासाठी आरक्षीत केलेल्या पाण्याचा वापर वाणिज्यिक हेतुसाठी होऊ नये याची खातर जमा करण्यासाठी मजनिप्राने आढावा घ्यावा.

## ११. विचारार्थ बाबी

११.१ याचिकेत पुढे आलेल्या युक्तींवादावरुन व उत्तरवादींच्या उत्तरावरुन चार बाबी विचारार्थ पुढे येतात -

(१) जेव्हा मुख्य अधिनियम २००५ अस्तित्वात होता तेव्हा एप्रिल २०१० मध्ये दाखल केलेल्या याचिकेस सुधारणा अधिनियम - एप्रील २०११ लागू होतो किंवा कसे ?

(२) प्राधिकरण, मजनिप्रा सुधारणा अधिनियम लागू असो वा नसो राज्य शासनाने हेटवणे मध्यम प्रकल्पातून बिगर सिंचन वापरासाठी केलेले वाटप रद्द करण्यासाठी हस्तक्षेप करु शकते काय ?

(३) हेटवणे प्रकल्पातून उत्तरवादींनी विविध बिगर सिंचन वाटप जुलै २०११ मध्ये रद्द केल्यानंतर ५१.८० दलघमी इतके पाणी सिंचनासाठी पुन्हा उपलब्ध केल्यावर परिणामी याचिकाकर्त्यांची गा-हाणी बव्हंशी कमी झाली का ?

(४) नसल्यास, प्राधिकरणाने याचिकाकर्त्यांची गा-हाणी कमी करण्यासाठी मुख्य अधिनियमातील तरतुदीनुसार हस्तक्षेप करावा किंवा कसे?

वरील बाबींवर प्राधिकरणाचे निष्कर्षाबाबत खाली विवेचन केले आहे.

११.२ बाबी (अ)

१) कायद्याच्या अर्थलावण्याच्या पध्दतीनुसार निर्णय घेण्याच्या दिनांकास लागू असलेले अधिनियम व त्याच्या सुधारणा हया लागू होतात. म्हणून सदर प्रकरणी सुधारीत अधिनियम लागू करणे आवश्यक ठरेल. कोणत्याही परिस्थितीत, सुधारीत अधिनियमातील कलम १ (२) सांगते की, "कलमे २ ते ६ ही दिनांक ८ जून २००५ पासून अंमलात आली असल्याचे समजण्यात येईल." सबब सुधारणा अधिनियम हा जरी १७ सप्टेंबर २०१० पासून अंमलात आला तरी कलम २ ते ६ मधील तरतुदी पूर्वलक्षी प्रभावाने, म्हणजे दि. ८ जून २००५ पासून, अंमलात येतील. सध्याच्या याचिकेतील उल्लेख केलेल्या २ ते ६ कलमाशी संबंधीत बाबीवर

निर्णय घेण्यासाठी सुधारणा अधिनियमातील कलम २ ते ६ चा वापर करावा लागेल.

२) सुधारणा अधिनियमातील कलम २ नुसार "उच्चाधिकार समिती" व "क्षेत्रीय वाटप" हयांच्या व्याख्यांचा नव्याने समावेश झाला आहे त्या खालीलप्रमाणे.

"(ट-१)" उच्चधिकार समिती याचा अर्थ, शासन निर्णय, पाटबंधारे विभाग, क्रमांक संकीर्ण १००१/(१५४-०१)/सिं. व्य. (धो) दिनांक २१ जानेवारी २००३, या अन्वये, राज्य शासनाने धटीत केलेली समिती

"(प-१)" "क्षेत्रीय वाटप" याचा अर्थ, राज्य शासनाने, जलसंपत्ती प्रकल्पांमध्ये वापराच्या विविध प्रवर्गांना केलेले वाटप.

उपरोक्त व्याख्यांचा मूळ अधिनियमात समावेश झालेला आहे. हयामुळे २१ जानेवारी २००३ च्या शासननिर्णयात संबोधीत केल्यानुसार उच्चाधिकार समितीची कर्तव्ये अधिनियमात दिली आहेत. "क्षेत्रीय वाटपाची" व्याख्या हक्कदारीपेक्षा स्पष्टपणे वेगळी आहे आणि हक्कदारीची मुख्य अधिनियमातील व्याख्या ही अधिनियमाच्या प्रयोजनासाठी पाण्याचा वापर करण्यासाठी कोणत्याही नदी - खोरे - अभिकरणाने दिलेले कोणतेही प्राधिकरार पत्र अशी आहे.

३) सुधारणा अधिनियमातील कलम ३ च्या परिणामी प्राधिकरणाच्या मूलभूत कर्तव्यात

खालीलप्रमाणे महत्वाचे बदल होतात.

मुख्य अधिनियमातील कलम ११ मध्ये

१) खंड (क) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईलः-

"(क) कलम १६ क अन्वये क्षेत्रीय वाटप केल्यानंतर विहित करण्यात येईल अशा अटी व शर्तीवर, नदी खोरे प्राधिकरणाकडून वापराच्या प्रत्येक प्रवर्गातील पाणी वापराच्या हक्कांचे वितरण करण्याकरिता निकष निर्धारित करणे"

सुधारणेपूर्वीच्या मजनिप्रा अधिनियमाच्या कलम ११ (क) नुसार प्राधिकरणाने विविध वापरकर्त्यांना हक्कदारीचे वाटप करणे कायद्याने बंधनकारक होते. सुधारणा अधिनियमात स्पष्ट करण्यात आले की, प्राधिकरणाची कार्यकक्षा ही शासनाने 'क्षेत्रीय वाटप' केल्यावर नदी खोरे प्राधिकरणाकडून वापराच्या प्रत्येक प्रवर्गातील पाणी वापराच्या हक्काचे वितरण करण्याकरीता निकष निर्धारित करणे, इतकी मर्यादीत

आहे. सुधारणा अधिनियम २०११ अन्वये "क्षेत्रीय वाटपाची व्याख्या" केली आहे आणि विविध प्रवर्गातील वापरकर्त्यांना क्षेत्रीय वाटप करण्याचे शासनास अधिकार आहेत. "क्षेत्रीय वाटप" करण्याच्या अधिकारात क्षेत्रीय वाटपात वाढ किंवा घट त्यानुसार बदल करण्याचाही समावेश होतो.

४) सुधारणा अधिनियम २०११ तील कलम ३१ (क) नुसार प्राधिकरणास हक्कदारी मंजूर करण्याचा अधिकार तेव्हाच प्राप्त होतो जेव्हा प्रकल्प म. सिं. प. शे. व्य. अधिनियम २००५ अंतर्गत येतो. म्हणजेच कार्यक्षेत्र निश्चित करण्यासह ज्या क्षेत्रांमध्ये सर्व संबंधित तरतुदींचे अनुपालन केले असेल अशा क्षेत्रांनाच हक्कदारी लागू होते. राज्य शासनाच्य दिनांक २९/६/२०११ च्या उत्तरावरुन हेटवणे सिंचन मध्यम प्रकल्पाबाबत अशी पूर्तता झाली नसल्यचे स्पष्ट होते.

५) सुधारणा कायदयाच्या कलम ६ नुसार मुख्य अधिनियमात समावेश केलेल्या कलम ३१ (ख) नुसार दि. १७ सप्टेंबर २०१० पूर्वी उच्चाधिकार समितीने अथवा राज्यशासनाने ज्या व्यक्तिस वाटप दिले असेल अशा व्यक्तिस ते हया अधिनियमानुसार दिले असल्याचे मानण्यात येईल. ३१ (ग) नुसार अशा वाटपाविरुध्द कोणतीही कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही, ३१ (ख) व (ग) ही दोन्ही कलमे अनुलंघनीय आहेत. म्हणजे विवादाच्या प्रसंगी मुख्य अधिनियमातील तरतुदी वा इतर कायदयातील तरतुदींना या तरतुदी अधिक्रमित करतील.

वरील बाबी पाहता याचिकाकर्त्यांनी शासनाच्या जलसंपदा विभागाने उच्चाधिकार समितीच्या माध्यमातून हेटवणे प्रकल्पांतून जलवितरणात, मजनिप्रा अधिनियमातील तरतुदी विचारात न घेता केलेल्या बदलास घेतलेल्या हरकती कायदयानुसार चालवून घेतल्या जाऊ शकणार नाहीत. हया हरकती शाश्वत नसल्याचे समजण्यात यावे. क्षेत्रीय वाटपाचे अधिकार शासनास आहेत. म. सिं. प. शे. व्य. अधिनियमातर्गतच्या प्रकल्पांच्या हक्कदारीबाबतचे निकष निर्धारित करण्यासंबंधात प्राधिकरणास अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. १७ सप्टेंबर २०१० पूर्वी शासनाने केलेले वाटप हे मजनिप्रा अधिनियमानुसार झाल्याचे समजण्यात येईल आणि त्याबाबत कोणतीही कायदेशीर कार्यवाही करता येवू शकणार नाही. कायदयाची उपरोक्त स्थिती

पाहता, याचिकाकर्त्यांनी घेतलेल्या आक्षेपांच्या तपशीलात शिरण्याची गरज नाही.

११.३ बाबी (२)

१) मुख्य कायदयातील कलम १२ (६) हे "प्राधिकरणाची सर्वसाधारण धोरणे" हया वर्गवारीत मोडते. त्यानुसार प्राधिकरणास समादेश क्षेत्रातील प्रत्येक जमीनधारकासाठी प्रकल्पस्तरावरील पाणी वापराचा कोटा ठरवता येईल. तथापि "कोटा" याचा अर्थ पाणी वापराचे प्रमाण जे, वार्षिक किंवा हंगामी पाणीवाटपाच्या टक्केवारीशी गुणाकार करुन काढले जाते. म्हणजे हे हक्क्दारीवरुन- पाण्याच्या वापराच्या प्राधिकारावरुन- ठरवले जाते. सुधारणा अधिनियमातील कलम ३१ (क) स्पष्ट करते की "हक्कदारी" ही संज्ञा, महाराष्ट्र सिंचन पध्दतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन अधिनियमांन्वये कार्यक्षेत्र निश्चित करण्यासह ज्या क्षेत्रांमध्ये सर्व संबधित तरतुदींचे अनुपालन केले असेल अशा क्षेत्रांना लागू होईल. "कोटा" ही संज्ञा सुध्दा "अशा प्रकल्पांना नदी खोरे अभिकरणाकडून वितरीत केलेले अधिकारपत्र" अशी आहे. म. सिं. प. शे. व्य अधिनियमानुसार हेटवणे प्रकल्पाच्या बाबतीत पूर्तता केली नसल्याने कलम १२ लागू होत नाही. सबब हा प्रकल्प महाराष्ट्र सिंचन (म. सिं.) कायदा १९७६ मधील कलम ५८ नुसार कार्यान्वित होत असून ज्या नुसार शेतकऱ्याने पाण्यासाठी (परवानगी) कालवा अधिका-यांकडे अर्ज दयावा असे अभिप्रेत आहे.

२) निरा देवघर प्रकल्पासाठी २००८ चा दावा क्र. १ बाबत दि. १०/११/२००८ अन्वये प्राधिकरणाने आदेश पारित केले. त्यातील परिच्छेद १२ चा उल्लेख हा गैरलागू आहे. हा परिच्छेद "जो प्रकल्प सार्वजनिक खाजगी सहभागातील निधीतून राबवावयाचा असतो त्यास प्राधिकरणाच्या कलम ११ (च) नुसार मान्यता घ्यावी लागते." हयाशी संबंधित आहे. शेतकऱ्यांना पाणी मिळवण्याच्या हक्काशी सदर परिच्छेदाचा दुरांन्वयानेही संबंध नाही.

३) सर्व प्रकल्पांचा म. सिं. प. शे. व्य या अधिनियमात समावेश होत असल्याने व हेटवणे प्रकल्पास सुधारणा अधिनियम लागू होण्यास केवळ अवधीचे अंतर आहे असा युक्तिवाद केला आहे.

जे प्रकल्प म. सिं. प. शे. व्य.-२००५ या अधिनियमात आणण्याचे नियोजन आहे त्यातून बिगर सिंचन वापरकर्त्यांना आरक्षण दिले तर केवळ प्रकल्प म. सिं. प. शे. व्य.-२००५ या अधिनियमाच्या कक्षेत आणण्यास विलंब होतो याचा अकारण परिणाम होईल

असाही तार्किक युक्तिवाद करता येईल. सबब हि धोरणात्मक बाब आहे की जी, प्राधिकरण सुधारणा अधिनियमातील तरतुदींशी बांधिल असल्याने, चर्चिली जाऊ नये. म. सिं. प. शे. व्य या अधिनियमाच्या कार्यकक्षेत असणाऱ्या प्रकल्पांबाबतही प्राधिकरणास प्रवर्गाच्या क्षेत्र वाटपात हस्तक्षेप वा बदलास प्रतिबंध करणेबाबत अधिनियमात क्येठेही तरतुद नाही. कारण क्षेत्रीय वाटपाबाबत सुधारित अधिनियमातील कलम २ (प-१) नुसार स्पष्ट केले आहे की हि बाब शासनाच्या अखत्यारित येते.

वरील बाबी पाहता हेटवणे प्रकल्पांतून बिगर सिंचन वापरकर्त्यांसाठी आरक्षित केलेल्या पाण्याबाबत प्राधिकरणास हस्तक्षेप आणि रद्दबदलास वाव नाही. मूळ अधिनियम सुधारित झाल्यामुळे सुधारित अधिनियम आता प्रचलित झाला आहे असे समजावे.

११.४ बाब (३)

i. दि. २९/६/२०११ च्या पहिल्या सुनावणीनंतर उत्तरवादींनी जुलै २०११ मध्ये सर्व औद्योगिक वापरकर्त्यांना दिलेले बिगर सिंचन वाटप परवाने मुदतबाहय झाल्या कारणाने रद्द केले. सबब ५१.८०५ दलघमी पाणी सिंचनासाठी पुन्हा उपलब्ध झाले. सुधारित नियोजनाप्रमाणे ६०५८ हे. सिंचनापैकी ५०४० हे. क्षेत्रावर सिंचन होऊ शकते. (६०५८ हे. च्या ९०% इतके).

ii. परिणामतः पुनर्स्थापित करावयाच्या नियोजित क्षेत्राच्या ९० % क्षेत्रावर सिंचन शक्य असल्याची आकडेवारी शासनाने पुरविली आहे. राज्य जलनीती नुसार सिंचनापेक्षा पिण्याच्या पाण्यास वरचा प्राधान्यक्रम आहे आणि औद्योगिक वापरकर्ता कोणी राहिला नसल्याने सिंचनाचे आरक्षण पुनर्स्थापित करण्याची मागणी लक्षणीय दृष्टया दूर झाली.

११.५ बाब (४)

१) प्राधिकरणास अधिनियमातील तरतुदीनुसार प्रकल्पांना मान्यता देण्याच्या टप्यापावेतो कार्यक्षेत्र आहे, त्यांच्या अंमलबजावणी साठी नाही. जलसंपदा विभाग हा संबंधित क्षेत्रीय विभाग/ मंडळे/ मुख्य अभियंता यांच्या माध्यमातून सविस्तर सर्वेक्षण, भूसंपादन, निधी व बांधकामाचे नियोजन व त्यासाठी निधी हयाला जबाबदार आहे. अधिनियमात या बाबींचा आढावा प्राधिकरणाकडून घेण्याबाबत तरतुद नाही.

२) अनुषेशाबाबत, प्राधिकरणास राज्यपालांचे आदेश अनुसरावे लागतात. भौतिक व आर्थिक अनुशेष दूर करण्यासाठी, प्राधिकरणाकडे, निवडक क्षेत्रातील प्रकल्पांचे विशेष

संनियंत्राणाचे काम सोपविण्यात आले आहे. हेटवणे प्रकल्प हा कोकणातील ज्या रायगड जिल्हयात आहे तो जिल्हा अनुशेषग्रस्त जिल्हा नाही व या जिल्हयातील प्रकल्पांचे नियंत्रण करण्यासाठी प्राधिकरणाकडे विशेष भूमिका सोपविलेली नाही.

सबब याचिकाकर्त्यांची गाऱ्हाणी दूर करणे वा त्यात हस्तक्षेप करण्याबाबत प्राधिकरणास निर्देशित करणारी कोणतीही तरतूद मुख्य अधिनियमात नाही.

वरील बाब पाहता याचिकाकर्त्यांची विनंती अमान्य करण्यात येत आहे.

## १२. निरीक्षणे

१) जलसंपदा विभागाने बिगर सिंचन वापरकर्त्यांच्या आरक्षणाच्या नवीन मागण्यांच्या पार्श्वभूमीवर, सिंचन आरक्षणात कपात करुन, प्राप्त व भविष्यात येणाऱ्या प्रस्तावांवर कोणतीही पुढील कार्यवाही करु नये अशी प्राधिकरणास विनंती केली. बिगर सिंचन वापरकर्त्यांतील औद्योगिक प्रवर्तकांचे आरक्षण रद्द झाल्याकारणाने सिंचन वाटपात भविष्यात होणा-या कपातीची याचिकाकर्त्यांची धास्ती पूर्णपणे कमी झाली नाही. जो पर्यंत प्रकल्प म. सिं. प. क्षे. व्य. कायद्याच्या कक्षेत येत नाही, तो पर्यंत क्षेत्रीय वाटप हे शासनाच्या लक्षात आलेल्या गरजांच्या प्राधान्यक्रमधारित बदलास संवेदनशील राहील. पण असे संरक्षण उपलब्ध झाल्यावर सर्व प्रवर्गातील वापरकर्त्यांना (अ) सुधारणा अधिनियमातील कलम ५ नुसार संरक्षण मिळेल ज्यानुसार वाटपाचे सामान्यपणे ३ वर्षापेक्षा कमी होणार नाही अशा कालांतराने पुनर्विलोकन करण्यात येईल असे प्रतिपादन केले आहे. आणि (ब) मुख्य अधिनियमातील कलम ११ (ज) अन्वये प्रत्येक प्रवर्गास अगोदरच देण्यात आलेल्या हक्कदारीवर क्षेत्रीय वाटपातील अशा बदलाने परिणाम संभवतो.

२) क्षेत्रीय वाटपाची बाब आता निश्चित झाली आहे. प्रकल्प जलदगतीने कार्यान्वित होण्यासाठी जलसंपदा विभागाने सर्व उपाययोजना कराव्यात जेणेकरुन साठा निर्मितीसाठी केलेली गुंतवणूक लवकर फलदायी होईल. हक्कदावेदारांबरोबर बांधकामातील उणीवा दूर करणे व भूसंपादन विषयावर संवाद यंत्रणा सुरु करण्याची याचिकाकर्त्यांची सूचना विचारणीय आहे.

३) जलसंपदा विभागाने म. सिं. प. शे. व्य अधिनियमातील संबंधित तरतुदी विचारात घेऊन १ घनमीटर प्रति सेकंद पेक्षा कमी विसर्ग असलेल्या वितरण व्यवस्थेच्या बांधकामाबाबत पाणी वापर संस्थांबरोबर सल्लामसलत करावी. हयामुळे निर्मित क्षमतेचा लवकर वापर होण्याची निश्चिती होईल.

अशा रितीने वरील निरीक्षणानुसार सदर याचिका फेटाळण्यात येत आहे.

सही
**व्यं. वि. गायकवाड**
सदस्य (अभियांत्रिकी)

सही
**ए. के. डी. जाधव**
सदस्य (अर्थव्यवस्था)
प्रभारी अध्यक्ष

**सु. वि. सोडळ**
सचिव